# हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड, कोल्हापूर

२२३/६ ई वार्ड, आत्माराम अपार्टमेंट, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३.

# मानपत्र

## अपंग मित्र पुरस्कार, २०२२

## महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

१९९६ मध्ये 'हेल्पर्स'ने अपंगार्थ वसतिगृह सुरु केले तेव्हा विद्यार्थ्यांना शाळा/कॉलेजात प्रवेश मिळण्यात खूप अडचणी आल्या. महावीर महाविद्यालयाने मात्र आमच्या विद्यार्थ्यांना सामावून घेण्यात स्वागतशील पुढाकार घेतला. गेली सुमारे २५ वर्षे 'हेल्पर्स' बरोबरच कोल्हापूर परीसरातील इतरही अनेक अपंग विद्यार्थी आपल्या महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत. या सर्व अपंग विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवून त्यांच्या प्रगतीची वाट प्रशस्त करण्याचे काम आपले सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिपाई बंधू-भगिनी करीत असतात. आपले महाविद्यालय अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच कला व क्रीडा क्षेत्रात नेहमीच प्रोत्साहन देत असते. प्रत्येक नवीन वर्षाचे स्वागत आपण अपंगांसाठी क्रीडा स्पर्धा आयोजित करून करता. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा, युवा महोत्सव, सेमिनार्स अशा उपक्रमांमध्येही सहभागाची संधी देऊन अपंग विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आपण वाढवत असता.

आपले भगवान महावीरांच्या दया, प्रेम आणि करुणेचे कृतीशील आचरण आणि आपल्या सुदीर्घ आणि संवेदनापूर्ण योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रविवार, दि. ४ डिसेंबर २०२२ रोजी जागतिक अपंग दिनाच्या कार्यक्रमात 'अपंग मित्र' पुरस्काराने आपला सन्मान करताना आम्हाला अतिशय आनंद वाटतो आहे.

आपल्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा!

पी. डी. देशपांडे
अध्यक्ष
हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड, कोल्हापूर